CMYK

जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीद्वारे ५ हजार ६७४ प्रकरणे निकाली >>पान 2

अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा द्या : ॲड.जयश्री शेळके >>पान 3

पराभवाने खचून जाऊ नका पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागा, लाडक्या बहिणीची माजी आ. संजय रायमुलकर यांना भावनिक साद >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



बॉलिवूड अभिनेत्रीचं मराठीत दमदार पदार्पण, 'इलू इलू' म्हणत एलीची 'या' दिवशी होणार सिनेमागृहांत एन्ट्री
आतील पान

**सुविचार**
चुकांमधून शिकणे हे प्रगतीचे चिन्ह आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 126 ■ मंगळवार, दि. 17 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# खासदार सांस्कृतिक महोत्सवामुळे नागपूरकरांना देशभरातील कलावंतांना अनुभवण्याची पर्वणी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस








दैनिक आपला विदर्भ

**नागपूर /प्रतिनिधी : खासदार सांस्कृतिक महोत्सवाने नागपूर, विदर्भाला देशभरातील विचारवंत, कलावंतांना ऐकायला, पाहायला तसेच अनुभवण्याची संधी दिली. महोत्सवाची ही पर्वणी अशीच लाभत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

मुख्यमंत्र्यांनी आज खासदार सांस्कृतिक महोत्सवास भेट दिली. त्यावेळी मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मंत्री पंकजा मुंडे, आ.मंजुळा गावित, आ.अमित गोरखे, माजी आमदार अनिल सोले, दैनिक हितवादचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र पुरोहित, उद्योजक यशपाल आर्य, पदमेश गुप्ता, यशपाल गुप्ता आदी उपस्थित होते.

देशभरातीलच नाही तर आपल्या भागातील कलावंतांसाठी देखील खासदार सांस्कृतिक महोत्सव मोठे व्यासपीठ, दालन ठरले आहे. महोत्सवातील वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धांमधून नागपूरचे सांस्कृतिक क्षेत्र उजळून निघेल. या महोत्सवाच्या आयोजनासाठी आयोजन समितीचे आभार मानतो. मुख्यमंत्री झाल्यानंतर नागपुरातील हा माझा पहिलाच जाहीर कार्यक्रम आहे, त्याचा विशेष आनंद असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले. महोत्सवातील कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे पार पडतात. हा महोत्सव नागपूरकरांच्या जीवनाचा अंग झाला आहे. कुमार विश्र्वास यांच्यासारख्या लेखक, कवी, विचारवंताच्या कार्यक्रमात उपस्थित राहता आल्याचा आनंद आहे. कुमार विश्र्वास उपस्थितांना मंत्रमुग्ध करतात. ते केवळ तत्वच सांगत नाही तर तात्विकतेने जगत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कुमार विश्र्वास यांच्या 'अपने अपने राम' या कार्यक्रमासदेखील मुख्यमंत्री श्री.फडणवीस उपस्थित



राहिले. खासदार महोत्सवातून स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न आहे. मनोरंजनातून सांस्कृतिक अभिरुची, लोकप्रबोधन, लोकसंस्कार होत आहेत. महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य, समर्थन लाभते, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.


## सायबर पोलिसांची प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्यांवर कारवाई; ७ लाखांचा गुटखा जप्त




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी** : मध्यप्रदेशातून आयात केलेला सात लाखांचा प्रतिबंधित गुटखा सायबर पोलिसांनी जप्त केला आहे. मुकुंदवाडीतील पायलट बाबा नगरी परिसरात ही कारवाई करण्यात आली. सुरेश रमेश खोतकर (रा. पायलट बाबानगरी, मुकुंदवाडी) असे पकडलेल्या विक्रेत्याचे नाव असून त्याच्या माहितीवरून सोहेल महेमूद सय्यद (३०) आणि सिराज सय्यद (दोघे रा. बीड बायपास) या दोन्ही पुरवठादार देखील आरोपी असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक घोरपडे यांनी दिली आहे. गुटखा सोहेल सय्यद आणि त्याचा भाऊ सिराज सय्यद यांच्याकडून आणल्याची कबुली दिली, तसेच, खोतकरविरुद्ध तीन वर्षांपूर्वी एक गुन्हा असल्याचेही पोलिसांनी सांगितले. दरम्यान, सोहेलविरुद्ध मुकुंदवाडी, जिन्सीत गुन्हे दाखल आहेत. खोतकर हा अग्रवाल आणि सोहेल बेकरीवाला यांना गुटखा विक्री करणार होता, अशी माहिती समोर आल्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल घोरपडे यांनी सांगितले आहे.

## केडीएमसीच्या हद्दीत वर्षभरात १८ हजार नागरीकांना भटक्या कुत्र्यांचा चावा



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी** : कल्याण डोंबिवलीच्या रस्त्यावर फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांमुळे नागरीक त्रस्त आहेत. काही दिवसापूर्वी टिटवाळा येथील भटक्या कुत्र्यांकडून एका महिलेवर हल्ला करण्यात आला. त्याचा सीसीटीव्ही व्हायरल झाला. त्यानंतर कल्याणमध्ये एका शाळकरी मुलाला चावा घेतल्याची घटना समोर आली. कल्याण डोंबिवलीत गेल्या वर्षभरात १८ हजार नागरीकांना कुत्र्यांनी चावे घेतले आहेत. आत्तापर्यंत १२ हजार भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे अशी माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी दीपा शुक्ला यांनी दिली आहे.



## विधानपरिषदेत नवनियुक्त मंत्री, नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर /प्रतिनिधी** : विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आज विधानपरिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित मंत्री, राज्यमंत्री व नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

यामध्ये मंत्री म्हणून सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे-पाटील, हसन मुश्रीफ, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, गणेश नाईक, दादाजी भुसे, संजय राठोड, धनंजय मुंडे, मंगलप्रभात लोढा, उदय सामंत, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक ऊईके, शंभुराज देसाई, ड. आशिष शेलार, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, ड. माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवाळ, संजय सावकारे, संजय सिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, मकरंद जाधव पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री म्हणून माधुरी मिसाळ, आशिष जयस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर - साकोरे, इंद्रनील नाईक आणि योगेश कदम यांचा समावेश होता.

नवनियुक्त सदस्यांचा परिचय

तसेच भावना गवळी, प्रज्ञा सातव, परिणय फुके, योगेश टिळेकर या सदस्यांसह राज्यपाल नियुक्त सदस्य धर्मगुरू बाबुसिंग राठोड या सदस्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला परिचय करून दिला.

## श्रीसिद्धिविनायक गणपती बाप्पाचे सिंदूर लेपनामुळे तेजस्वी रूप



**मुंबई /प्रतिनिधी** : सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी श्रीसिद्धिविनायक गणपती बाप्पाच्या सिंदूर लेपनानंतरचे पहिले दर्शन अतिशय शुभ आणि पवित्र मानले जाते. आज हा क्षण भक्तांसाठी विशेष असतो, कारण बाप्पाचा नवा रूप अनुभवण्याची आणि त्याच्या कृपेचा आशिर्वाद घेण्याची संधी मिळते. सिंदूर लेपनामुळे बाप्पाचे तेजस्वी रूप अधिकच भावपूर्ण असते.

## बीड, परभणीच्या घटना गंभीर; सरकारची सविस्तर चर्चेची तयारी

### संविधानचा अपमान सहन केला जाणार नाही : मुख्यमंत्री

**नागपूर /प्रतिनिधी** : बीड, परभणी येथील घडलेल्या दोन्ही घटना गंभीर आहेत. या घटनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून संविधानचा अपमान सहन केला जाणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेबांच्या संविधानानुसार अपेक्षित चर्चा सभागृहात झाली पाहिजे. संविधानाचा अपमान करणारा व्यक्ती मनोरुग्ण होता. विरोधी पक्षाने राजकारण न करता अशा घटना घडू नयेत यासाठी चांगल्या सूचना मांडाव्यात अशी अपेक्षा देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थगन प्रस्ताव दरम्यान सविस्तर चर्चा करण्यात येईल असे स्पष्ट केले.

### जरांगेंना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं, डावलल्यानंतर नाराज भुजबळांचा हल्लाबोल

**मुंबई /प्रतिनिधी** : अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळाले नाही. यामुळे भुजबळ कमालीचे संतप्त झाले असून, त्यामुळेच ते मेळाव्याला उपस्थित राहिले नसल्याची चर्चा मेळाव्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये होती. या घडामोडीमुळे उलट-सुलट चर्चेला उधाण आले असून, नागपूरच्या थंडीत राजकीय वातावरण तापले आहे. यानंतर आज छगन भुजबळ यांनी थेट हल्लाबोल केला. मनोज जरांगे यांना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं, अशी संतप्त प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली. तसेच मंत्रिपद कितीवेळा आलं आणि कितीवेळा गेलं, तरी भुजबळ संपला नाही, असंही छगन भुजबळ म्हणाले.

## पैशांचा पाऊस पाडून देण्याच्या बहाण्याने दीड लाखांची लूट करणाऱ्या आरोपींच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने आवळल्या मुसक्या

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : शिरपूर येथील पळासनेर च्या जंगलामध्ये पैशाचा पाऊस पाडून देतो असं खोटं सांगत दीड लाख रुपयांहून अधिकची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे, यादरम्यान आरोपींनी पैसे परत न देता बंदुकीतून दोन राउंड फायर केल्याचे देखील उघडकीस आले आहे, या घटनेतील चौघा आरोपींच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने आणि सांगवी पोलिसांनी मध्य प्रदेश येथून मुसक्या देखील आवळल्या आहेत,

सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या दोघा जणांनी आम्ही पैशांचा पाऊस पाडून देतो असे सांगितल्यानंतर मध्य प्रदेश येथील चौघांनी पैसे पाडून देण्याच्या बदल्यात दीड लाख रुपये देणार असा व्यवहार ठरल्यानंतर, पैसे न पडल्याने दिलेले दीड लाख रुपये परत मागितले परंतु संबंधितांनी ते पैसे देण्यास नकार दिला, आणि त्यादरम्यान त्यांच्यात



झालेल्या झटापटीत दोन फायर बंदुकीतून देखील झाडण्यात आले आहेत, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी या संपूर्ण घटनेचा तपास करून मध्यप्रदेश येथून चौघा जणांच्या मुसक्या आवळल्या असून, यातील सांगवी येथील पैसे पाडून देण्याच अमिष दाखवणाऱ्या दोघां विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, या संदर्भात धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पत्रकार परिषदेत या घटनेची माहिती दिली आहे.

CMYK

## भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र व्हावा!

राज्यात भाजप, शिवसेना ( शिंदे गट ) व राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) यांचे महायुती सरकार विक्रमी बहुमताने स्थापन झाले. आजवर कोणत्याच सरकारला मिळाले नाही इतके विक्रमी बहुमत या सरकारला महाराष्ट्रातील मतदारांनी दिले आहे. या सरकारचा शपथविधी समारंभ नुकताच मोठ्या थाटामाटात पार पडला. माननीय देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर माननीय एकनाथ शिंदे व माननीय अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ३९ आमदारांनी देखील नागपुरात मंत्रीपदाची शपथ घेतली. नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच सरकार क्शन मोड मध्ये आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व विभागाची बैठक घेऊन सचिवांना पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम आखण्यास सांगितले आहे. जनातेच्याही या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. एक तरुण म्हणून मला तरुणांचे प्रश्न महत्वाचे वाटतात. नव्या सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवेत. कारण गेल्या चार पाच वर्षात राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही त्यात आर्थिक मंदी आणि कोरोणाने अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. सरकारी नोकरभरती बंद आहे. रोजगार नसल्याने राज्यातील तरुण नैराश्याच्या गर्तेत अडकला आहे. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढायचे असेल तर रोजगार निर्मितीसाठी सरकारने ठोस प्रयत्न करायला हवेत. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मुख्यमंत्र्यांनी नोकर भरतीचे आश्र्वासन दिले आहे ही आनंदाची बाब असली तरी ही नोकरभरती कंत्राटी नको तर कायम स्वरूपाची हवी. मागील सरकारने नोकर भरतीचे दिलेले आश्र्वासन हवेतच विरले. या सरकारने तरी नोकर भरतीचे दिलेले आश्र्वासन पूर्ण करावे. राज्यातील ४० टक्के लोकसंख्या १८ ते ४५ या वयोगटातील आहे या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतल्यास महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल यात शंका नाही. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मागील काळात महाराष्ट्रातील काही उद्योग गुजरातमध्ये गेल्याचे आपण पाहिले आहे आता तरी महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात जाणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. उद्योगधंद्यात महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर ठेवण्याचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. महाराष्ट्रात मोठे उद्योग आले तर रोजगारी कमी होऊन राज्याची अर्थव्यवस्था गतिमान होईल. महायुती सरकारने जे विक्रमी बहुमत मिळवले आहे त्यात राज्यातील लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मते दिली आता सरकारनेही लाडक्या बहिणींना विसरु नये. लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्र्वासन पूर्ण करावे. त्यासोबतच महागाई करून दार्जिनाही दिलासा द्यावा. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे पाठवले म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर लाडक्या बहिणींच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारने घ्यायला हवी. राज्यात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. तीन वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या आजीपर्यंत सर्व वयोगटातील महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. सरकारने महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालून आणि नराधमांना कठोर शिक्षा द्यावी. मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले शक्ती विधेयक या सरकारने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. मागील काही काळापासून राज्यातील शेतकरी सरकारी धोरणावर नाराज आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत. शेतकऱ्यांसोबत कष्टकरी, कामकरी आणि व्यापारी वर्गाचे देखील प्रश्न सरकारने प्राधान्याने सोडवावेत. जनतेचा सर्वाधिक पैसा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होतो. या सरकारने जनतेचा शिक्षण आणि आरोग्यावर होणारा खर्च कमी करावा. राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना निरोगी आरोग्य लाभेल या दृष्टीने सरकारने धोरणे आखावित. सरकारने सर्वांना परवडेल अशा माफक दरात आरोग्यसेवा पुरवावी. के जी ते पी जी शिक्षण मोफत करावे. या सरकारने इंदु मिल मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी. या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. जलसिंचन, नदी जोड सारखे प्रकल्प राबवावेत. सरकारने प्रशासनातील भ्रष्टाचार मोडून काढावा. राज्यातील स्त्रिया, मुलींना सुरक्षित वाटेल असे कायद्याचे राज्य स्थापन करावे. जाती – जातीत, धर्मा – धर्मात तणाव वाढत आहे. हा तणाव कमी करून राज्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण करावे. एकूणच या सरकारने भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र निर्माण करावा.

# जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीद्वारे ५ हजार ६७४ प्रकरणे निकाली

## ५१ कोटी ८० लक्ष रूपयांची तडजोड शुल्क वसूल

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय व राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशाने जिल्ह्यातील सर्व न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत ९०२ प्रलंबित व ४ हजार ७७२ दाखलपूर्व अशा एकूण ५ हजार ६७४ प्रकरणात समेट घडून आला. त्यात एकूण ५१ कोटी ८० लक्ष ४३ हजार ९८१ रूपयांची तडजोड शुल्क वसूल झाली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा तथा वकील संघ बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील राष्ट्रीय लोकअदालत मध्ये बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद तसेच वाहतुक शाखा, भारतीय दुरसंचार निगम आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे दाखलपूर्व ५१ हजार ५७५ प्रकरणे दाखल झाले होते. त्यापैकी ४ हजार ७७२ प्रकरण निकाली निघाली असून रुपये २ कोटी ४० लक्ष ८० हजार ४७४ रुपये तडजोड शुल्क वसुल करण्यात आले. न्यायालतील प्रलंबित प्रकरणे १३ हजार ५५९ रुपये ठेवण्यात आले असून त्यापैकी ९०२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून एकूण रुपये ४९ कोटी ३९ लक्ष ६३ हजार ५०७ रुपये तडजोड शुल्क वसुल करण्यात आले. असे एकूण बुलढाणा जिल्ह्यात ६५ हजार १३४ प्रकरणे ठेवण्यात आले. त्यापैकी एकूण ५ हजार ६७४ प्रकरणे निकाली काढण्यात आले असून ५१ कोटी ८० लक्ष ४३ हजार ९८१ रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

बुलढाणा येथे तिसरे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर डी.पी. काळे, यांचे पॅनल क्र. तीनवर भुसंपादन प्रकरण रे.द.क्र. २५३/२०२४ किसनराव संतोषराव भुतेकर व इतर ३–वि– महाराष्ट्र शासन व इतर २ या प्रकरणामध्ये आपसात होवून संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला म्हणून एकूण ३६ कोटी ६४ लक्ष रुपये महाराष्ट्र शासनातर्फे अर्जदारास देण्याचे ठरले. सदर प्रकरणातील पक्षकारांचा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष एस.सी. मुनघाटे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष एस.सी. मुनघाटे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा न्यायाधीश–०१ आर.एन. मेहेरे, बुलढाणा, मुख्य न्यादंडाधिकारी एस.आर. गायकवाड, तीसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर बुलढाणा डी. पी.काळे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्त्र, बुलढाणा पी.बी. देशपांडे, चौथे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बुलढाणा पी.ए.खंडारे, असे एकूण ५ पॅनल तयार करण्यात आले होते. सदर पॅनलवर ॲड. रत्नमाला गवई, ॲड. आरीफ युसुफ सैय्यद, ॲड. ए.एस.इंगळे, ॲड. एस.टी. इंगळे व ॲड. एस.एस.तायडे यांनी सहाय्यक पंच म्हणूना काम पाहिले. बुलढाणा जिल्हा वकील संघाचे सर्व विधिज्ञांनी राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्याकरीता योगदान दिले.

राष्ट्रीय लोक अदालतीचे यशस्वीरित्या आयोजन पार पाडण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितीन पाटील तसेच जिल्ह्याचे सर्व वकील संघाचे विधीज्ञ, बँकांचे अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शीतलहरीच्या प्रभावापासून संरक्षणासाठी उपाययोजना; काय करावे, काय करु नये

राज्यभरात थंडीचा कडाका वाढत असल्याने वातावरणात आमूलाग्र बदल दिसून आहे. ज्यामुळे विशिष्ट क्षेत्रातील तापमान सरासरीपेक्षा खूप कमी होते. ही घटना अचानक घडू शकते किंवा काही दिवसांपर्यंत टिकू शकते. ज्यामुळे मानवी जीवन, शेती, पशुधन आणि आर्थिक व्यवस्था प्रभावित होतात. त्यामुळे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन विभाग, मुंबई यांनी शीतलहरीच्या प्रभावापासून संरक्षणासाठी उपाययोजनाबाबत काय करावे, काय करु नये याबाबत मार्गदर्शक सूचना जाहिर केल्या आहेत. ते याप्रमाणे :

**पूर्व तयारी**

रेडिओ ऐका, टीव्ही पहा, स्थानिक हवामान अंदाजासाठी वर्तमानपत्रे वाचा आणि थंडीची लाट आहे की नाही हे जाणून घ्या. हिवाळ्यातील कपड्यांचा पुरेसा साठा करावा. एकापेक्षा अधिक थराचे कपडे असल्यास उपयुक्त राहील. आपत्कालीन पुरवठा तयार ठेवावा. फ्लू, वाहते/नाक भरून येणे किंवा नाकातून रक्त येणे, दिर्घकाळ सर्दी अशी लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हवामान आणि आपत्कालीन सूचनांचे बारकाईने पालन करावे आणि दिलेल्या सल्लूयानुसार कार्य करावे. शक्य तितके घरात राहावे आणि थंड वाऱ्याचा संपर्क टाळण्यासाठी प्रवास कमी करावा. सैल फिटिंगचे, हलके, वारारोधक उबदार लोकरीचे कपडे घालावे, जाड कपड्यांचा एकापेक्षा जास्त थर असावा. घट्ट कपड्यांमुळे रक्ताभिसरण कमी होण्याची शक्यता असते.

शीतलहरीमध्ये स्वतःला कोरडे ठेवावे. आपले डोके, मान, हात आणि पायाची बोटे पुरेशी झाकून ठेवावे. हातमोजेपेक्षा मिटन्सला प्राधान्य द्या. मिटन्स हे थंडीपासून अधिक उबदारपणा आणि इन्सुलेशन प्रदान करतात. टोपी, मफलर, इन्सुलेटेड व वॉटरप्रूफ जोडे वापरा. शरीराचे तापमान समतोल राखण्यासाठी सकस आहार घ्यावा. रोगप्रतिकारक शक्ती राखण्यासाठी व्हिटॅमिन–सी युक्त फळे आणि सकस आहार घ्यावा. गरम द्रवपदार्थ नियमितपणे घ्यावे. कारण यामुळे थंडीशी लढण्यासाठी शरीरातील उष्णता टिकून राहते. तेल, पेट्रोलियम जेली किंवा बॉडी क्रीम त्वचेची काळजी घेण्यासाठी नियमितपने वापरावी. वृद्ध लोकांची आणि मुलांची काळजी घ्यावी आणि एकटे राहणाऱ्या शेजारील वृद्धांना त्यांच्या आरोग्याबाबत विचारपूस करावी. आवश्यकतेनुसार अत्यावश्यक पुरवठा व पुरेसे पाणी साठवून ठेवावे. गैर–औद्योगिक इमारतींसाठी उष्णता इन्सुलेशनच्या मार्गदर्शक सूचनांचे अनुसरण करावे. शीतलहरींच्या संपर्कात असताना सुन्नपणा, बोटे, कान आणि नाक पांढरे किंवा फिकट दिसणे यासारख्या हिमबाधाच्या लक्षणांकडे लक्ष द्या. थंडीच्या दीर्घकाळापर्यंत संपर्कामुळे त्वचा फिकट, कडक आणि बधीर होऊ शकते आणि बोट,तळपाय, नाक किंवा कानात काळे फोड आल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. प्रभावित झालेल्या भागांवर कोमट पाण्याने उपचार करा. कांपण्याकडे दुर्लक्ष करू नका. शरीरातील उष्णता कमी होत असल्याचे पहिले लक्षण असून त्याकडे दुर्लक्ष करु नये. हिमबाधा/हायपोथर्मियाने ग्रस्त असलेल्या व्यक्तीसाठी शक्य तितक्या लवकर वैद्यकीय मदत घ्यावी. पशुधन किंवा पाळीव प्राण्यांना थंड हवामानापासून सुरक्षित ठेवावे. शीतलहरींच्या तीव्र संपर्कामुळे शरीराच्या तापमानात घट होऊन हायपोथर्मिया होऊ शकतो. ज्यामुळे थरकाप, बोलण्यात अडचण, तंद्री, स्नायू कडक होणे, स्वास घेण्यात त्रास होणे, अशक्तपणा किंवा चेतना नष्ट होऊ शकते. त्यामुळे हायपोथर्मिया ही एक वैद्यकीय आणीबाणी असून त्यावर त्वरित वैद्यकीय उपचार आवश्यक आहे. विशेषत: कोविड–१९ च्या काळात विविध आजार, वाहते किंवा नाक भरणे यासारख्या लक्षणांसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. राष्ट्रीय आपत्ती व्यावस्थापना विभागाचे (एनडीएमए) चे मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड करावे.

**हायपोथर्मियाची लक्षणे असल्यास काय करावे**

हायपोथर्मियाची लक्षणे असलेल्या व्यक्तीला उबदार ठिकाणी घेऊन जावे आणि त्यांचे कपडे बदलावे. ब्लँकेटचे थर, कपडे, टॉवेल किंवा चादरी वापरून व्यक्तीचे शरीर उबदार करावे. शरीराचे तापमान वाढण्यास मदत करण्यासाठी उबदार पेय द्यावे. मद्य सेवन करु नये. परिस्थिती बिघडल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी.

**काय करू नये**

दीर्घकाळापर्यंत थंडिचा संपर्क टाळावा. मद्य सेवनाने शरीराचे तापमान कमी होवून रक्तवाहिन्या अरुंद होवून हायपोथर्मियाचा धोका वाढू शकतो. हिमबाधा झालेल्या भागाची मालिश करू नका. यामुळे अधिक नुकसान होऊ शकते. शरीर थरथरने हे उष्णता कमी होत असल्याचे हे पहिले लक्षण आहे, त्याकडे दुर्लक्ष करू नका. घरातच राहण्याचा प्रयत्न करा. प्रभावित व्यक्तीला कोणतेही द्रव देवू नका.

**शेतीविषयी उपाययोजना**

शितलहरीच्या प्रभावामुळे काळी गंज, पांढरा गंज, उशीरा होणारा तुषार इत्यादी रोगांसह पिकांचे नुकसान होते. तसेच पिकांची उगवण, वाढ, फुलोरा उत्पन्न आणि साठवण क्षमतेत विविध प्रकारचे व्यत्यय येतात.

**काय करावे**

पिकांच्या मुळांची चांगली वाढ होण्यासाठी बोर्डोत मिश्रण किंवा कॉपर ऑक्सी–क्लोराईड, फॉस्फरस (पी) आणि पोटॅशियम (के) ची फवारणी करावी. शीतलहरी दरम्यान शक्य तिथे हलके आणि वारंवार स्प्रिंकलरद्वारे जमिनिचे सिंचन करावे. बागायती आणि फळबागांमध्ये आंतरपीक शेती पध्दतीचा वापर करावा. भाजीपाल्यास थंड वाऱ्यापासून संरक्षण मिळेल असे नियोजन करावे. किरणोत्सर्गाचे शोषण वाढवा आणि हिवाळ्यात रोपवाटिका आणि कोवळ्या फळांच्या झाडांना झाकून उबदार वातावरण तयार करावे. सेंद्रिय अच्छादन व थंड वाऱ्याचा वेग कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.



**पशुसंवर्धन, पशुधनाविषयी उपययोजना**

शीतलहरींच्या काळात ऊर्जेची गरज वाढते म्हणून प्राणी आणि पशुधनांना उदरनिर्वाहासाठी अधिक अन्न लागते. म्हैस/गुरे यांच्या इष्टतम प्रजनन हंगामात तापमानातील फरक प्राण्यांच्या प्रजनन दरावर परिणाम करू शकतो.

**काय करावे**

रात्रीच्या वेळी प्राण्यांचे निवारा स्थान (गोठे) चारही बाजूंनी झाकून ठेवावे. थंडीच्या दिवसात प्राण्यांना, विशेषतः लहान प्राण्यांना झाकून ठेवावे. पशुधन आणि कुक्कुटांचे थंड हवामानापासून संरक्षण करावे. प्राण्यांच्या आहारात उच्च दर्जाच्या चारा किंवा कुरणांचा वापर करावा, चरबी पूरक खाद्य द्यावे. हिवाळ्यात जास्तीत जास्त सूर्यप्रकाश आणि उन्हाळ्यात कमी रेडिएशन देणारे स्मार्ट शेडचे बांधकाम करावे.

काय करू नये

थंडीच्या वातावरणात जनावरांना मोकळ्या जागेत किंवा बाहेर फिरत सोडू नये. जनावरांचे वाहतूक(पशुमेळावा) टाळावे. जनावरांना थंड चारा व थंड पाणी देणे टाळावे. प्राण्यांच्या निवास स्थानात ओलसरपणा आणि धूर टाळावा. रात्री आणि थंडीच्या वेळी जनावरांना उघड्यावर ठेवू नका. मृत जनावरांचे शव जनावरांच्या चरण्याच्या मार्गावर टाकू नयेत.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### छत्रपती संभाजी नगर-नाशिक राज्य मार्गावर विंचूर येथे भुजबळ समर्थकांचे रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : नागपूर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या विस्तारामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते व माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्यामुळे भुजबळ समर्थक व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व मित्र पक्षाचे पदाधिकारी आक्रमक होत येवला-लासलगाव विधानसभा मतदारसंघातील निफाड तालुक्यातील विंचूर येथे छत्रपती संभाजीनगर-नाशिक राज्य मार्गावर अर्धा तासच्या जवळपास रस्ता रोको आंदोलन करत आपला निषेध व्यक्त केला. भुजबळांना योग्य सन्मान न दिल्यास याहीपेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला यावेळी वाहतूक कोंडी होत वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

### सिने अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे यांनी घेतले साई दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी /प्रतिनिधी** : मराठी सिने अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे यांनी आज माध्यान्ह आरतीला उपस्थित राहुन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे वतीने प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी, मंदीर प्रमुख विष्णु थोरात उपस्थित होते.

### अभिनेत्री कतरीना कैफ यांनी घेतले साई समाधीचे दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी /प्रतिनिधी** : प्रसिद्ध सिने अभिनेत्री कतरीना कैफ यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे वतीने प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी, मंदीर प्रमुख विष्णु थोरात उपस्थित होते.

### बॉलिवूड अभिनेत्रीचं मराठीत दमदार पदार्पण, 'इलू इलू' म्हणत एलीची 'या' दिवशी होणार सिनेमागृहांत एन्ट्री

**मुंबई/प्रतिनिधी** :एकीकडे मराठी चित्रपट देशविदेशातील चित्रपट महोत्सवांमध्ये बाजी मारत आहेत. तर दुसरीकडे बॉक्स ऑफिसवर काही मराठी चित्रपट भरघोस कमाई करताना दिसत आहेत. त्यामुळे हिंदीपासून इतर भाषिक कलाकार मराठी सिनेसृष्टीकडे आकर्षित झालेले पहायला मिळत आहेत. यात आता प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री एली आवराम हे नाव देखील सामील झालं आहे. एव्हाना बॉलीवूड मध्ये आपला चांगला जम बसवलेली एली 'इलू इलू' या मराठी चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. फाळके फिल्म्स एन्टरटेमेंट प्रॉडक्शन आणि अजिंक्य बापू फाळके दिग्दर्शित 'इलू इलू' मनोरंजक लव्हस्टोरी ३१ जानेवारीला आपल्या भेटीला येत आहे.

# अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा द्या : ॲड.जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलडाणा व मोताळा शहरातील विविध भागात सुरु असलेली अतिक्रमण हटाओ मोहिमेला थांबवून व्यावसायिकांचा सहानुभूतीपुर्वक विचार करण्यात यावा यासाठी आज महाविकास आघाडीच्या नेत्या ॲड.जयश्री शेळके यांच्यावतीने मा.जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

बुलडाणा शहरातील मुख्य बाजारपेठेत मुबलक प्रमाणास मोकळ्या जागेचा अभाव आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांमध्ये जवळपास मागील ४० वर्षांपासून गरजू व्यावसायिक अतिक्रमणच्या जागेवर आपला व्यवसाय करित आहेत. त्यांनी याठीकाणी शुन्यातून आपला व्यवसाय वाढीस लावला असून सद्यस्थित व्यवसायाचा चांगला जम बसला आहे. परंतु बुलडाणा शहरातील इकबाल चौक परिसर, कुंभार गल्ली, बाजारगल्ली, पोस्ट ऑफीस परिसर येथे प्रशासनाच्या वतीने अचानक अतिक्रमण हटवण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मोताळा शहरातील आठवडी बाजार चौक आणि परिसरातील अतिक्रमणधारक व्यावसायिकांना प्रशासनाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सर्व अतिक्रमण धारक व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पर्यायी जागा उपलब्ध न करता त्यांचे व्यवसाय उठवून व्यावसायिकांच्या पोटाची भाकर हिसकावून घेऊ नका अशी मागणी ॲड.जयश्री शेळके यांनी प्रशासनाकडे केली आहे.


वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी व्यवसाय करत असतांना अचानक प्रशासनाने अतिक्रमण हटवण्याची कार्यवाही पिडीतांना तसेच नागरिकांना कोड्यात टाकणारी आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्र्वभुमीतून सुडाच्या भावनेने ही कार्यवाही केली जात असल्याची चर्चा सद्या शहरात होत आहे. अतिक्रमण धारक व्यावसायिकांमध्ये अनेक व्यावसायिकांची परिस्थिती हालाकीची आहे. काहींनी तर कर्ज भांडवलाची गुंतवणूक करुन नव्याने व्यवसाय सुरु केला आहे. या सर्व अतिक्रमणधारक व्यावसासिकांचा सहानुभूतीपुर्वक विचार होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे बुलडाणा व मोताळा शहरातील अतिक्रमणधारक व्यावसायिकांना व्यवसायासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन दिल्याशिवाय अतिक्रमण हटवू नये अशी मागणी ॲड.जयश्री शेळके यांनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. नझूलच्या जमिनीबाबत नगरपालिका कोणत्या आधारावर नोटीसा काढत आहेत अशी विचारणा करत मा.आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यावसायिकांकडे सहानुभूतीने पाहण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) जिल्हा कार्याध्यक्ष नरेश शेळके, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) तालुकाध्यक्ष तुळशीराम काळे, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष लखन गाडेकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्ता काकास, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अनिल बावस्कर, आशिषबाबा खरात, एकनाथ कोरडे, जाकिर कुरेशी, सत्तार कुरेशी, अब्दुल कुरेशी, राहुल जमादार, अनिकेत गवळी, मो.सोफियान, सलीम पठाण, सय्यद बिल्लाल डोंगरे, मो. सादिक, शेख इलीयात अमीर, मो. शाकीर, नवेद हुसेन, इकबाल अहेमद खान, शेख अकील, शेख करीम, शेख नूर मोहम्मद, शेख इब्रामान, नदीम शेख, शेख इकबाल कुरेशी, मो.जावेद मो.फारुख, शेख मोइन शेख सलीम, शेख अकसर शेख हैदर कुरेशी, शेख लाल शेख महेबूब, मो.जावेद, विजय राऊत, बाला राऊत, विनोद गवई, अविनाश जाधव, श्रीकांत जाधव, धनंजय बाहेकर, निलेश पाटील, स्मिता वराडे, सपना इंगळे, किर्ती परिहार, वंदना जवंजाळ, उदय देशमुख, संदीप बोर्डे इ.उपस्थित होते.

# १५ गुंठ्यांत लावला घेवडा लागवड अन् ५० दिवसात केली २ लाखांची केली कमाई

दैनिक आपला विदर्भ





**सोलापूर/प्रतिनिधी** : आज शेतकरी शेतीकडे व्यवसाय म्हणून बघत आहेत. वाढती लोकसंख्या आणि मोठ्या प्रमाणात वाढणारी बेरोजगारी हे अतिशय गंभीर विषय बनला आहे. त्यामुळे शेतकरी पण कमी क्षेत्रात कस जास्त उत्पन्न घेता येईल असे नव नवीन प्रयोग करताना दिसत आहेत. हराळवाडी गावातली शेतकरी रंगनाथ पुडलिक गावडे या शेतकऱ्याने तब्बल १५ गुंठ्यांत घेवडा लागवडीतून पहिल्या तोड्यात तब्बल २ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.

रंगनाथ पुडलिक गावडे रा. हराळवाडी तालुका मोहोळ असे शेतकऱ्याचे नाव आहे. रंगनाथ यांनी त्यांच्या शेतात प्रयोग करत पहिल्यांदाच घेवड्याची लागवड केली आहे.६ फुटांवरबेड पाडून मशागत करून गावखत भरून ड्रिप टाकून घेवड्याची लागवड केली आहे. रंगनाथ हे आदी १५ गुंठ्यांत दोडक्याची शेती करत होते. एका तोड्याला ७०० ते ७५० किलो घेवडा निघत होता.सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे घेवड्याला ६० ते ६५ रूपये प्रति किलो दर मिळत आहे. तर या घेवडा विक्रीतून रंगनाथ यांनी दोन लाख रुपयाचे उत्पन्न मिळवला आहे.महाराष्ट्रात सोलापूर पुणे, सातारा, अहमदनगर,नाशिक इत्यादी जिल्ह्यांमध्ये घेवड्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.भाजीपाला शेतीतून बरेच शेतकरी चांगल्या प्रकारचे उत्पन्न काढत आहेत. काहीजण आधुनिक तंत्रज्ञांन पद्धतीने भरगोस उत्पन्न काढतात, तर कोठे सेंद्रिय पद्धतीने अधिक उत्पन्न काढून पैसे मिळवले जातात.

शेतीला जोडधंदा म्हणून प्रत्येक शेतकऱ्याने आर्ध एकर ते एक एकर शेतात घेवड्याची लागवड करावी. या घेवडा विक्रीतून घर खर्च, मुलांचा शिक्षणाचा खर्च कोणताही खर्च असं या घेवडा विक्रीच्या माध्यमातून तो खर्च काढता येतो.उसापेक्षा शेतकऱ्याने घेवड्याची लागवड करावी असे आवाहन बारावी पर्यंत शिक्षण घेतलेले शेतकरी रंगनाथ गावडे यांनी केले आहे.

### 'बेस्ट' बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार - मुख्यमंत्री

नागपूर, दि. १६ : मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानपरिषदेत नियम २८९ अन्वये विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. श्री. फडणवीस म्हणाले की, 'बेस्ट' बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस 'बेस्ट'च्या ताफ्यात येणार आहेत. बेस्ट बसेसची वस्तुस्थिती जाणून घेऊन उपाययोजना राबविण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना 'बेस्ट' प्रमुखांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत रुजू झालेले प्रशिक्षणार्थांची माहिती सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत विविध आस्थापनेवर प्रशिक्षणार्थींना नियुक्ती देण्यात आली आहेत. नियुक्ती झालेल्या प्रशिक्षनार्थींना आस्थापनेवर यापुर्वी रुजू झालेले परंतु संकेतस्थळावर नावे अॅड करताना तांत्रिक अडचणी येत आहे. अशा आस्थापनांनी प्रशिक्षनार्थीचे माहिती दि.१७ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त ग.प्र.बिटोडे यांनी केले आहे.

कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांनी दिलेल्या निर्देशानुसार विविध आस्थापनेवर यापुर्वी रुजू झालेले परंतु cmykpy.mahaswayam.gov.in संकेतस्थळावरती नाव अॅड न होवू शकलेले उमेदवारांना अॅड करुन देण्याबाबत शेवटची संधी म्हणून या कार्यालयाच्या लॉगीन मध्ये टॅब उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आपल्या आस्थापनांमध्ये योजनेअंतर्गत नियुमानुसार नियुक्त केलेले प्रशिक्षणार्थी यांची माहिती आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यात यावी.

आवश्यक कागदपत्रे : संबंधित आस्थापनेचे पत्र, CMYKPY संकेतस्थळावर अॅड न केलेल्या प्रशिक्षणार्थी यांच्या नावाची संपुर्ण माहितीसह यादी (रुजू दिनांक,आधार नंबर, आधार लिंक बँक डिटेल्स,बँक पासबुक/ कॅन्सल चेक,ईमेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक). महास्वयंम संकेतस्थळावरती प्रसिध्द केलेल्या जाहिरातीचा स्किनशॉट. प्रशिक्षणार्थींचे नियुक्ती आदेश, प्रशिक्षणार्थी यांचे स्वयंघोषणापत्र तसेच रुजू आदेश, प्रशिक्षणार्थी उच्चत्तम शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र (उदा.बारावी/पदविका/आयटीआय/पदवी/पदव्युत्तर पदवी) आणि स्वयंसाक्षांकित केलेले आधर कार्ड. प्रशिक्षणार्थी यांच्या नावात बदल असल्यास त्याबाबतचा पुरावा (उदा. नवात बदल बातचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र), प्रशिक्षणार्थी यांचे आधार लिंक बँक डिटेल्स.

ऑनलाईन पद्धतीने उमेदवार रुजू करुन घेण्यासाठी आवश्यक परिपुर्ण कागदपत्रे व माहिती विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावी. जेणेकरुन ऑनलाईन अॅड व विद्यावेतन करण्याची कार्यवाही विहीत मुदतीस पुर्ण करणे शक्य होईल. विहित मुदतीत माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व त्यामुळे प्रशिक्षणार्थी ऑनलाईन रुजू/अॅड करुन घेण्याच्या प्रक्रियेपासून वंचित राहिल्यास प्रशिक्षक्षणार्थ्यांच्या विद्यावेतनाबाबत जबाबदारी संबंधित कार्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी.

## युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनाला सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित रहावे - राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार

### ६ जानेवारी २०२५ पत्रकार दिनानिमित्त नागपूर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी** :नवीन वर्षाच्या सुरुवातीला ६ जानेवारी २०२५ रोजी नागपूर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अधिवेशन घेण्याचे ठरले असून राज्यभरातील सर्व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी अधिवेशनाला उपस्थित रहावे असे आवाहन युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे.अल्पवाधितच फक्त महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघटनेची बांधणी करून कमी वेळेत आपल्या कार्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त सदस्य संघटनेला जुळविले व संपूर्ण महाराष्ट्र तसेच देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत आहे.समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर हे ब्रिद वाक्य समोर ठेवून एक वर्षाआधी युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली.

एवढ्या कमी वेळेत देशभरातील पत्रकारांना संघटनेशी जुळवून त्यांच्या अडिअडचणी व समस्या सोडवून पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी सदैव त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याचे काम युवा ग्रामीण संघ करत आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला ६ जानेवारी २०२५ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाला सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे.

# देशात संविधान संस्कृती निर्माण व्हावी : डॉ. प्रेम हनवते

दैनिक आपला विदर्भ




**उमरखेड/प्रतिनिधी** : २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपल्या देशाने संविधान सभेव्दारा निर्मित नव संविधानाचा स्वीकार केला या घटनेला आज ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. भारत देशाचे सार्वभौमत्व, प्रजासत्ताक लोकशाही गणराज्याची एकता आणि अखंडता टिकविण्याचे महत्वपूर्ण कार्य भारतीय संविधानाने उत्तम प्रकारे केलेआहे. त्यामुळेच आपल्या देशात सांसदीय लोकशाही टिकून आहे. एक व्यक्ती एक मत आणि एक मूल्ये प्रदान करून सर्व भारतीय नागरिकांना न्याय, समता,स्वातंत्र्य आणि बंधुतेची ग्वाही देत विकासाची समान संधी उपलब्ध करून देणाऱ्या सविधानामुळेच आपण आज सुरक्षित आहोत. देशात अराजकता माजवून संविधान आणि लोकशाही मूल्यांना सुरुंग लावू पाहणाऱ्या विध्वंसक प्रवृत्ती ला रोखण्यासाठी देशात संविधान संस्कृती वाढीस लागण्याची आज गरज असल्याचे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक डॉ प्रेम हनवते यांनी केले. ते मुव्हमेंट फॉर पीस अँड जस्टीस या संघटने तर्फे राज्यव्यापी संविधान सर्वांनसाठी अभियाना अंतर्गत आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवसा निमित्त विशेष कार्यक्रमात बोलत होते . देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा, संविधान निर्मितीचा इतिहास सांगून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानावर हनवते यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले.

या प्रसंगी मंचावर इनायत उल्ला जनाब , डॉ प्रा अनिल काळबांडे,ड यासीर खान , अॅड अरमान शेख , शाहरुख पठाण, कामरान खान आदि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रस्ताविक रसुल पटेल यांनी सुत्र संचालन फिरोज अन्सारी यांनी तर आभार प्रदर्शन साबीर नाईक यांनी केले.

# पराभवाने खचून जाऊ नका पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागा, लाडक्या बहिणीची माजी आ. संजय रायमुलकर यांना भावनिक साद

## तुम्ही आमचे भाऊच आणि भाऊच राहणार महिलांची माजी आ. रायमुलकर यांना पाठबळ



मेहकर : मेहकर विधानसभा मतदारसंघात तब्बल पंधरा वर्षापासून आपले अधिराज्य गाजवणाऱ्या माजी आ.संजय रायमुलकर यांचा यावेळेस अल्पशा मताने पराभव झाला. त्यामुळे माजी आ.संजय रायमुलकर हे थोडे नर्वस झाले असले तरी माजी आ. संजय रायमुलकर यांना लाडक्या बहिणीने पाठबळ देत भाऊ तुम्ही आमचे भाऊ आणि भाऊच राहणार असे म्हणून पाठबळ देत झालेल्या पराभवातून सावरण्यासाठी मोठे पाठबळ दिले.





मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात गत १५ वर्षापासून माजी आ. संजय रायमुलकर हे प्रचंड मताधिकाने विजय होत आले आहेत. दोन वर्षांपूर्वी राज्याच्या राजकारणात झालेल्या उलथापाथिने शिवसेनेत दोन गट निर्माण झाले. परिणामी शिंदे शिवसेना गट व उद्धव बाळासाहेब ठाकरे गट असे दोन गट निर्माण झाले.त्यामुळे शिवसेना व हिंदुत्ववादी मतदार संघ हा विभागला गेला. नॅरेटिव प्रचाराने शिवसेना शिंदे गटातील मताचे विभाजन झाले. परिणामी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना शिंदे गटाचे नवखे उमेदवार सिद्धार्थ खरात हे अल्पशामताने विजय झाले. असे असले तरी मतदारसंघातील मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणी असलेल्या महिलांनी गत तीन आठवड्यापासून माजी आ.संजय रायमुलकर यांच्या घरी होत असलेली गर्दी वसरली नाही. महिलांनी माजी आ. संजय रायमुलकर यांची गत पंधरा दिवसापासून भेट घेत त्यांना पाठबळ दिले आहे. भाऊ तुम्ही पराभूत झाले असले तरी आमचे भाऊ तुम्हीच आहात आणि भविष्यातही राहणार आहात. यावेळेस नियतीने घात केला असला तरी पुढील वेळेस आम्ही तुम्हाला आमदार म्हणून प्रचंड मताधिकाने विजयी करून असा विश्वास देत माजी आ. संजय रायमुलकर यांना पाठबळ दिले. मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या या पाठबळाने माजी आमदार संजय रायमूलकर हे काहीसे भावनिक झाले होते. तुम्ही पराभूत झाले असले तरी तुमचे कार्य सोडू नका सत्कमाचे आपले कार्य सुरूच ठेवा असे आवाहन करीत मतदारसंघातील लाडक्या बहिणीने माजी आ. संजय रायमुलकर यांना पाठबळ देत पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागण्याचे बळ दिले मतदारसंघातील लाडक्या बहिणीच्या या प्रेमाने माजी आ. संजय रायमुलकर हे काहीसे भावनिक झाले असल्यास प्रकारही दिसून आला.

### मतदार संघाच्या सर्वांगी विकासासाठी साडेचार हजार कोटी रुपयांचा निधी

मतदार संघाच्या सर्वांगी विकासासाठी साडेचार हजार कोटी रुपयांचा निधी प्रत्येक समाजासाठी निधी दिला. कधी नव्हे एवढा निधी मतदार संघाच्या विकासासाठी खेचून आणला. या निधीतून विकासकामे होण्यास प्रारंभही झाला. या अडीच वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघातील रुपडे बदलत असताना व विकासाला गती येत असताना मतदारांनी मात्र का नाकारले असा भावनिक प्रश्न यावेळी माजी आ. संजय रायमुलकर यांनी लाडक्या बहिणी समोर उपस्थित केला. मी नेमकं कुठे कमी पडलो, हे कळायला मला मार्ग नाही असे मतही यावेळी त्यांनी आपल्या थोरल्या बहिणी समोर व्यक्त केले.मी कुठे कमी पडलो असेल, कुठे चुकलो असेल तर भाऊ म्हणून मला कळवा मी त्यामध्ये दुरुस्ती करीन आणि मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करीण असे मतही माजी आ. संजय रायमुलकर यांनी मतदारसंघातील लाडक्या बहिणींनीं त्यांची भेट घेतल्यानंतर साधलेल्या संवादा वेळी व्यक्त केले.मी जेव्हा केव्हा चुकेल तेव्हा माझ्या हक्काच्या व वडीलधाऱ्या असलेल्या बहिणीने माझी चूक माझ्या लक्षात आणून द्यावी आणि सत्कर्मासाठी मला सतत मार्गदर्शन करावे, असे आवाहनही यावेळी माजी आ. संजय रायमुलकर यांनी केले. गत पंधरा दिवसापासून लाडक्या बहिणीची माजी आ. संजय रायमुलकर यांच्या घरी होत असलेली गर्दी पाहून मतदार संघातील मतदार महिलांचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या प्रति असलेले प्रेम यावेळी दिसून येत आहे. तब्बल पंधरा दिवसापासून होत माजी आ. संजय रायमुलकर यांच्या घरची गर्दी वसरायला तयार असल्याने मतदारांमध्ये त्यांच्याप्रती असलेली सहानुभूती अर्थात प्रेम दिसून येत आहे.

### साहेब पुन्हा कामाला लागा

निवडणुकीमध्ये जय पराजय होत असतो. आपला पराभव झाला असल्या तरी खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने, नव्या उमेदीने कामाला लागा आणि गोरगरिबाची तुम्ही खूप सेवा केली त्याचा फळ निश्रि्चत मिळणारच असे भावनिक साथ घालत माजी आ. संजय रायमुलकर यांना लाडक्या बहिणीने मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील लाडक्या बहिणी अर्थात महिलांनी पाठबळ दिले. महिलांच्या या प्रेमाने माजी आ. संजय रायमुलकर हे एक कणखर नेतृत्व असतानाही थोडा वेळ भावनिक झाले असल्याचे दिसून आले.महिलांच्या या पाठबळाने माजी आ. डॉक्टर संजय रायमुलकर यांना पुन्हा नवी ताकद मिळाली असून लाडक्या बहिणीच्या या पाठबळाने माजी आ.संजय रायमुलकर यांनी पुन्हा नव्या जोमाने नव्या उमेदीने कामाला प्रारंभ केला आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## धुळ्यात अज्ञातांनी केली बसवर दगडफेक



**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील दसेरा मैदान जवळ नाशिक शहादा ही राज्य परिवहन महामंडळाची बस अज्ञातांनी फोडल्याची घटना घडली असून याप्रकरणी अज्ञातांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. बस फोडण्या मागील कारण मात्र अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेत सुदैवानं चालक वाहक किंवा प्रवासी कुणीही जखमी झाले असल्याची माहिती बसचे चालक भरत नाईक यांनी यावेळी दिली.

## अनुकंपाधारक उमेदवारांची सुधारीत जेष्ठता यादी जाहिर; मुळ कागदपत्र तपासणीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२४ ची अनुकंपाधारक उमेदवारांची सुधारीत अंतीम जेष्ठता यादी जिल्हा परिषदच्या www.zpbuldana.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. अनुकंपा पदभरतीची कार्यवाही करण्यापुर्वी सन २०२४ च्या अनुकंपाधारक उमेदवारांच्या अंतीम जेष्ठता यादीतील अ.क्र. १ ते २४४ पर्यंत उमेदवारांची मुळ शैक्षणिक कागदपत्र व इतर आवश्यक कागदपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने उमेदवारांची शैक्षणिक अर्हतेची माहिती अद्यावत करण्यासाठी अंतिम जेष्ठता यादीतील अनुकंपाधारक उमेदवारांनी दि. १८ व १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद बुलढाणा येथे मुळ कागदपत्र तपासणी करण्याकरीता उपस्थित राहावे. याची सर्व अनुकंपाधरक उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.) यांनी केले आहे.





